लोहघोगरी गावाजवळुन कन्हान नदीतुन (जि. छिंदवाडा म. प्र.) बोगद्याद्वारे १० TMC पाणी तोतलाडोह जलाशयात वळविण्याच्या प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमाक संकीर्ण –२०१९/(प्रक्र २४५/२०१९)/मोप्र-२
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक:- १७ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना:-

मध्यप्रदेश शासनाद्वारे पेंच नदीवर चौराई येथे धरण बांधले आहे. चौराई धरण होईपर्यंत मागील २८ वर्षापासून तोतलाडोह येथे उपलब्ध होणारे सर्व पाणी वापरण्यात येत होते. त्यातून नागपूर शहरासाठी पाणी पुरवठा योजना व सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत होते. मध्यप्रदेशातील चौराई धरणाच्या बांधकामामुळे पेंच जलविद्युत प्रकल्प, तोतलाडोह धरणात येणाऱ्या येव्यात घट झाल्याने तोतलाडोह धरणाच्या पाणी साठयात व सिंचनात लक्षणीय घट झालेली आहे.सदर तफावत भरुन काढण्यासाठी शासन निर्णय क्रमांक सकिर्ण -२०१५ /प्र.क्र. ४१२/१५, जंस (अ) दि. २८.१०.२०१६ अन्वये गठीत समितीच्या शिफारसीस अनुसरुन पेंच जलसिंचन प्रकल्पासंदर्भात उदभवलेल्या गंभीर पाणी टंचाईवर मात करण्यासाठी कमी कालावधीत व दीर्घ कालावधीत पूर्ण होऊ शकणाऱ्या उपाययोजना करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

या निर्देशांची अंमलबजावणी त्वरीत होण्याचे दृष्टीने मध्यप्रदेशातील चौराई येथील धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पाच्या पाणी साठयात व सिंचनात झालेल्या घटीमुळे उद्भवलेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

लोहघोगरी गावाजवळून कन्हान नदीतून (जि. छिंदवाडा म. प्र.) बोगद्याद्वारे १० TMC पाणी तोतलाडोह जलाशयात वळविण्याच्या प्रकल्पास खालील मुद्यांच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) मध्यप्रदेशातील चौराई धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पासंबंधात उद्भवलेल्या गंभीर पाणीटंचाई परिस्थितीवर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत प्रस्तावित मध्यप्रदेशातील लोहघोगरी गावाजवळून कन्हान नदीतून (जि. छिंदवाडा म. प्र.) बोगद्याद्वारे १० TMC पाणी तोतलाडोह जलाशयात वळविणे या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही हाती घेण्यात यावी व त्याकरिता आवश्यक अनुदान उपलब्ध करुन घेण्यात यावे.

२) प्रस्तावित योजनेसाठी लागणा-या आवश्यक वैधानिक मान्यता जसे, पाणी उपलब्धतता प्रमाणपत्र, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मान्यता, पर्यावरण मान्यता, वनजमीन मान्यता, केंद्रीय जलआयोगाची मान्यता ईत्यादी आवश्यक सर्व मान्यता या प्रकल्पास प्राप्त करुन घेण्यात याव्यात.

३) प्रस्तावित उपाययोजनांच्या सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनाकरिता व प्रकल्प व्यवस्थापनाकरिता केन्द्र शासनाच्या WAPCOS या अभिकरणास नियुक्त करण्यात यावे.

४) प्रकल्पास जामघाट प्रकल्पाप्रमाणेच महाराष्ट्र व मध्यप्रदेश शासनाच्या आंतरराज्यीय नियंत्रण मंडळाकडुन मान्यता मिळविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

५) या योजनेसाठी येणा-या संपूर्ण खर्चासाठी विशेष अतिरिक्त नियतव्यय नगरविकास विभागास उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच सदर योजनेस प्रशासकीय मान्यता जलसंपदा विभागाने द्यावी व योजनेचे काम नगरविकास विभागाकडून प्राप्त होणा-या नियतव्ययातून जलसंपदा विभागाने ठेव तत्वावर करावे.

६) वित्त विभागाने हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आवश्यक निधी ३ वर्षाच्या कालमर्यादेत नगरविकास विभागाला उपलब्ध करुन द्यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १५८/१९/व्यय १२ दि.१५.०६.२०१९, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ८८/१४३४ दि.१४.०६.२०१९ व नगर विकास विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४९/UOR १९/ दि.२७.०६.२०१९ व २८/UOR१९/दि.१६.०८.२०१९ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१८२५१२८८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.09.18 11:15:09 +05'30'

(म. ई. धरणे)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष/ उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४) मा. सभापती/ उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६) मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानपरिषद, मुंबई.
७) मा. मंत्री, (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. मंत्री, (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव (नगर विकास)यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) प्रधान सचिव (जलसंपदा)यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सचिव, (जसंव्य व लाक्षेवि)यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर.
१७) निवडनस्ती मोप्र-२